**ठळक बातम्या**

- इराण - अमेरिका शांतता कराराला दोन्ही देशांची मंजुरी, जगभरातल्या नेत्यांकडून स्वागत
- फ्रान्समध्ये बावन्नाव्या जी सेव्हन शिखर परिषदेला आजपासून सुरवात
- NTA कडून NEET UG पुनर्परीक्षेची प्रवेशपत्रं जारी
- १९व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून सुरुवात

**आणि**

- महिलांच्या टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तानचा पराभव करत भारताची विजयी सलामी

<><><><><>

इराण आणि अमेरिका यांच्यात शांतता करार करण्यास दोन्ही देशांनी सहमती दर्शवली आहे. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून धुमसणाऱ्या पश्चिम आशियात शांतता प्रस्थापित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या करारानंतर अमेरिकेने इराणच्या बंदराची केलेली नाकेबंदी उठेल तसंच लेबननसह सर्व ठिकाणच्या कारवाया थांबतील, असं इराणचे उप परराष्ट्र व्यवहार मंत्री काझम घरीबाबादी यांनी आज प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना सांगितलं. इराण आणि अमेरिका १९ जूनला स्वित्झर्लंड इथं शांतता स्थापन करण्यासाठी सामंजस्य कराराच्या अंतिम मसुद्यावर स्वाक्षऱ्या करतील असं ते म्हणाले.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही समाजमाध्याद्वारे याला दुजोरा दिला. हा करार पूर्ण झाला असून यानंतर होर्मुजची सामुद्रधुनीचा मार्ग खुला होईल असं ते म्हणाले

संयुक्त राष्ट्राचे महासचिव एँतिनियो गुटेरस यांच्यासह जगभरात्लया नेत्यांनी या कराराचं स्वागत केलं आहे.

कतारचे प्रधानमंत्री शेख मोहम्मद बिन अब्दुल रहमान बिन जस्सीम अल थानी यांनी इराण आणि अमेरिका शांतता कराराचं स्वागत केलं तसंच हा करार करण्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले त्यांचं अभिनंदन केलं.

हा करारा युद्ध समाप्ती आणि प्रादेशिक स्थिरतेसाठी टाकलेलं महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचं ब्रिटन चे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांनी म्हटलं आहे.

जर्मनीचे चान्सलर फेडरिक मर्ज यांनीही कराराचं स्वागत केलं आणि याचा जगाच्या स्थैर्यावर सकारात्मक परिणाम होईल असं म्हटलं आहे.

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इम्यॅन्युएल मॅक्राँ यांनीही या कराराचं स्वागत केलं आहे.

**<><><><><>**

फ्रान्समध्ये एव्हियन इथे आज बावन्नावी जी सेव्हन शिखर परिषद सुरू होत आहे. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, युके, अमेरिका आणि युरोपीयन महासंघ सहभागी होत आहेत. याशिवाय फ्रान्सने भारत, ब्राझील, इजिप्त, केनिया, दक्षिण कोरिया, कतार, सौदी अरेबिया, सीरिया, युक्रेन आणि संयुक्त अरब अमिरात या देशांना भागीदार देश म्हणून आमंत्रित केलं आहे.  जी सेव्हन शिखर परिषदेत सहभागी होण्याची भारताची ही तेरावी वेळ असेल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आउटरिच कंट्रीज विभागासाठीच्या परिषदेत सहभागी होतील.  प्रमुख आर्थिक महासत्ता, विकसनशील जगासाठी एक राजनैतिक दुवा आणि इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील धोरणात्मक आधारस्तंभ म्हणून भारत जी सेव्हनसाठी महत्त्वाचा आहे.

**<><><><><>**

फ्रान्समध्ये नीस इथला दौऱ्याचा पहिला टप्पा पूर्ण केल्यानंतर स्लोवाकियाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी काल राजधानी ब्रातिस्लावा इथे पोहोचले. स्लोवाकियाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री जुराज ब्लानार यांनी त्यांचं स्वागत केलं. यावेळी स्लोवाकियाच्या पारंपरिक पद्धतीने प्रधानमंत्री मोदी यांचं स्वागत करण्यात आलं. या दौऱ्यात आज ते स्लोवाकियाचे प्रधानमंत्री रॉबर्ट फिको यांच्याशी चर्चा करणार आहेत. तसंच, ते स्लोव्हाकियाचे राष्ट्रपती पीटर पेलेग्रीनी यांचीही भेट घेतील. १९९३मध्ये स्लोवाकियाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतीय प्रधानमंत्र्यांची ही पहिलीच भेट आहे. ही भेट म्हणजे भारत आणि स्लोव्हाकिया यांच्यातील संबंध अधिक दृढ करण्याची आणि दोन्ही देशांमधील सहकार्याचे नवे आयाम शोधण्याची एक संधी आहे. त्यामुळे या भेटीसाठी असल्याचं, प्रधानमंत्री आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले आहेत.

**<><><><><>**

NTA अर्थात राष्ट्रीय परीक्षा संस्थेने पदवीपूर्व वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी होणाऱ्या NEET UG पुनर्परीक्षेची प्रवेशपत्रे जारी केली आहेत. उमेदवार neet.nta.nic.in या NTA च्या अधिकृत संकेतस्थळावरून आपली प्रवेशपत्रे डाउनलोड करू शकतात. ही पुनर्परीक्षा या महिन्याच्या २१ तारखेला दुपारी दोन ते सायंकाळी सव्वा पाच या वेळेत होणार आहे.

<><><><><>

देशात अन्नधान्याचा पुरेसा साठा असून एल निनोच्या प्रभावामुळे अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होणार नाही असं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज नवी दिल्लीत माईंडमाइन समिटमधे बोलत होत्या. यंदा नैऋत्य मोसमी पावसाचं प्रमाण सरासरीपेक्षा कमी असेल, असं त्या म्हणाल्या. खरीप हंगामासाठी खतांचा पुरेसा साठा उपलब्ध असून रब्बी हंगामासाठी नोव्हेंबर महिन्यापासून पुरवठा सुरू केला जाईल, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

पश्चिम बंगालमधल्या प्राथमिक शाळांमधल्या कथित भरती घोटाळ्याप्रकरणी ईडी अर्थात सक्तवसुली संचलनालयाने तृणमूल काँग्रेसचे महासचिव अभिषेक बॅनर्जी यांची चौकशी सुरू केली आहे. याआधी विधिमंडळ पक्षनेत्याच्या निवडीसाठी आमदारांच्या बनावट सह्या केल्याप्रकरणी सीआडीने त्यांची आठ तास चौकशी केली होती. या चौकशीचं चित्रीकरण केलं जाईल, तसंच अभिषेक बॅनर्जी यांची उत्तरं या प्रकरणातल्या साक्षीदारांच्या जबानींशी पडताळून पाहिली जातील असं ईडीच्या अधिकाऱ्यांनी वृत्तसंस्थेला सांगितलं.

<><><><><>

एकोणिसावा मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - मिफ आजपासून सुरू होत आहे. या महोत्सवाचा प्रारंभ आज संध्याकाळी मुंबईत रवींद्र नाट्य मंदिर इथे होईल. या वर्षीच्या स्पर्धा विभागात १४४ चित्रपटांचा समावेश आहे; यात १३ देशांतील चित्रपट निर्मात्यांच्या ५२ आंतरराष्ट्रीय आणि ९२ राष्ट्रीय प्रवेशिकांचा समावेश आहे. स्पर्धा-बाह्य विभागात ४६ सहभागी देशांतील एकूण २०२ चित्रपट दाखवले जातील. 'वेव्हज डॉक बाजार' विभागात यावर्षी एकूण १५५ प्रवेशिका असून त्यासोबतच 'वर्क इन प्रोग्रेस' लॅबमधील ५ प्रकल्प आणि 'फिल्म बाजार रेकमेंड्स' अंतर्गत १२ चित्रपटांचा समावेश असेल. पहिल्या दिवशी कॉर्डेल

बार्कर दिग्दर्शित ॲनिमेशनपट 'गुड लक टू यू ऑल', अरविन बेलार्मिनो आणि कायला डॅनेल रोमेरो दिग्दर्शित लघुपट 'अगापिटो', आणि सारा डोसा दिग्दर्शित 'टाइम अँड वॉटर' हा माहितीपट दाखवला जाईल. या वर्षीच्या आवृत्तीत 'मराठी चित्रपट' आणि 'ईकोज फ्रॉम नॉर्थईस्ट असे दोन नवीन विभागही सुरू करण्यात आले आहेत. मिफमध्ये यंदा प्रथमच एआय सिनेमा हॅकेथॉन आयोजित केली जाणार आहे. या स्पर्धेत ४८ तासांत चित्रपट निर्मितीचं आव्हान असेल.

<><><><><>

इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या महिलांच्या टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने आपल्या मोहिमेची जोरदार सुरुवात करत पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ६४ धावांनी पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारताने स्मृती मानधनाच्या ६८, हरमनप्रीत कौरच्या ३६ आणि ऋचा घोषच्या १७ चेंडूतील ३४ धावांच्या जोरावर १७० धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल पाकिस्तान संघ १७ षटकात केवळ १०६ धावा करू शकला. पाकिस्तानकडून मुनीबा अलीने सर्वाधिक ४१ धावा केल्या. तर भारताच्या दीप्ती शर्माने केवळ १० धावांच्या मोबदल्यात ५ खेळाडूंना तंबूचा रस्ता दाखवला.  या सामन्यात तिने आपला ३५० बळींचा टप्पा पूर्ण केला. दिप्ती शर्माला सामनावीर पुरस्कारानं गौरविण्यात आलं.

भारताचा पुढचा  सामना १७ जूनला लीड्स इथं नेदरलँड्सविरुद्ध होणार आहे.

स्पर्धेतल्या कालच्या दुसऱ्या सामन्यात बांगलादेशनं नेदरलँड्सवर सहा गडी राखून दणदणीत विजय मिळवला. फलंदाजीचा निर्णय घेत नेदरलँड्सने २० षटकांत ८ बाद १३८ धावा केल्या. बांगलादेशने १९ व्या षटकांत ४ गड्यांच्या मोबदल्यात हे लक्ष्य पार केलं.

<><><><><>

फिफा विश्वचषक स्पर्धेत, फ गटात झालेल्या सामन्यात, स्वीडननं ट्युनिशियाचा ५ - १ असा पराभव  केला. सामन्याच्या उत्तरार्धात स्वीडननं शानदार कामगिरी करत निर्णायक विजय मिळवला.

या स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात जर्मनीनं क्युरासाओच्या संघाचा ७-१ नं पराभव केला तर जपान आणि नेदरलँड्स यांच्यात झालेला सामना अनिर्णित राहिला. आज या स्पर्धेत स्पेन आणि काबो वेर्दे यांच्यात सामना होणार आहे.

<><><><><>

मराठवाड्यात उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून कोकण आणि गोव्यात पुढील दोन दिवस उष्ण आणि दमट हवामान राहील, असा अंदाज भारतीय हवामान विभागानं व्यक्त आहे. दिल्लीत कमाल तापमान ३८ ते ४० अंश सेल्सिअस आणि किमान तापमान २५ ते २७ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील.

//<><><><><>//